## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## अपिल क्रमांक : तक्रार क्र -८२५/२०२१

**तक्रारकर्ता,** श्री.विलास आसाराम साळवे
रा.शिवनेरी टुडे, पो.बॉक्स नं.११८८२
भांडूप पूर्व, मुंबई ४०० ०४२

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय रायगड विभाग
कल्पतरु इमारत, मुख्य पोस्ट ऑफियस जवळ
ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय रायगड विभाग
कल्पतरु इमारत, मुख्य पोस्ट ऑफियस जवळ
ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २८.५.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २.६.२०२० | ----- | १.८.२०२० | १२.१०.२०२० |

तक्रारकर्ता यांनी दि.१६.४.२०२१ रोजीच्या अर्जान्वये "कोणतीच माहिती दिली नाही" असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २८.५.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).तथापि, विद्यमान जन माहिती अधिकारी ऑनलाईन उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" *(आपल्या कार्यालयात कार्यरत असलेल्या कर्मचा-यांच्या वेतनाबाबत माहिती.)* "

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी जोडपत्र ब मध्ये "असमाधानकार उत्तर." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१२.१०.२०२० रोजी सुनावणी घेऊन, " *जन माहिती अधिकारी यांनी मुद्देनिहाय माहिती व त्या संबंधित कागदपत्रांचे प्रती अपिलार्थी यांना ताबडतोब देण्यात यावीत.*" असे आदेश पारित केले आहेत.

तक्रारकर्ता अनुपस्थित असल्यामुळे तक्रार अर्जावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी असे कथन केले की, प्रथम अपिलिय अधिकारी यांच्या आदेशानुसार तक्रारकर्ता यांना दि.२१.१०.२०२० रोजीच्या पत्रान्वये नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात आलेली आहे. तक्रारदार यांनी त्यांच्या द्वितीय अपिल अर्जामध्ये कोणतीच माहिती दिली नाही असे नमूद केले आहे. तथापि, जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदारांना दि.२१.१०.२०२० रोजी माहिती दिल्याचे दिसून येते.

तक्रारदार आज अनुपस्थित आहेत त्यामुळे त्यांचेकडून वस्तुस्थिती जाणून घेता आली नाही. मात्र, सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांच्या अधारे असे दिसून येते की, तक्रारदारांना माहिती पुरविण्यात आलेली आहे. या प्रकरणात पुढील कार्यवाही शिल्लक नसल्याने यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती देण्यात आल्यामुळे, अपील निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २८ मे, २०२४

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

संगणक -१०